# नारपोली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९२५ /२०२५ दि. २६/०६/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, नारपोली** वाहतूक उप विभागाच्या हददीत टाटा प्रोजेक्ट लिमीटेड यांचेकडुन राहनाळगांव येथे असलेल्या रेल्वेच्या अंडरपासचे काम दिनांक २७/०६/२०२५ रोजी ते दिनांक ३०/०६/२०२५ रोजी पर्यंत करण्यात येणार आहे. सदर काम करतेवेळी अंजुर फाटा ते राहनाळगांव तसेच राहनाळगांव ते अंजुरफाटा अशा दोन्ही वाहीनीवरील वाहतूक पुर्णपणे बंद करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) अंजुरफाटा, चर्नीपाडा रेल्वे अंडरपास येथुन राहनाळगांव कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **'अंजुर फाटा '** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने अंजुरफाटा रेल्वे लाईन खालुन मोठा अंडरपास मार्गे अंजुर चौकातुन इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) राहनाळगावा कडुन मनीसुरत कंम्पाऊंड मधुन रेल्वे अंडरपास येथुन जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **'मनी सुरत कंम्पाऊंड'** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने अंजुर चौकातुन रेल्वे लाईन खालुन मोठा अंडरपास मार्गे अंजुर फाटा येथुन इच्छित स्थळी जातील.

**सदर अधिसूचना दि.२७/०६/२०२५ रोजी रात्रौ ००:०१ वा. ते दिनांक ३०/०६/२०२५ रोजी रात्रौ २४:०० वा. पावेतो अंमलात राहील.**

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण.
मा. आयुक्त, भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिका, भिवंडी/बृहन्मुंबई
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२/वि.शा.ठाणे.

CamScanner

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, भिवंडी
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, भिवंडी/ठाणे.
**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.
**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, भिवंडी व पो.निरी. भिवंडी, नारपोली, कोनगांव वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

CamScanner